# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ, नागपुर

## गोविन्दराम सेकसरिया अर्थ-वाणिज्य महाविद्यालय, नागपुर



## “राष्ट्रीय सेवा योजना पथक”

## वार्षिक कार्यक्रम अहवाल

## २०२०-२१


**संयोजक**

**डॉ. ए. बी. पटले**
**राष्ट्रीय सेवा योजना समिति**

**अध्यक्ष/ प्राचार्य**

**डॉ. एन. वाय. खंडाईत**
**राष्ट्रीय सेवा योजना समिति**

# वंदनीय राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज



या भारतात बंधुभाव नित्य वसू दे, दे वरचि असा दे...
हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे, मतभेद नसू दे।

**गो. से. अर्थ-वाणिज्य महाविद्यालय नागपूर**

**“राष्ट्रीय सेवा योजना पथक”**

**कार्यक्रम अहवाल**

**२०२०-२१**

राष्ट्रीय सेवा योजना समिती अध्यक्ष व मा. प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत यांनी सत्र २०२०-२१ साठी राष्ट्रीय सेवा योजना समितीची स्थापना खालील प्रमाणे केली.

- प्रा. डॉ. ए. बी. पटले — कार्यक्रम अधिकारी
- प्रा. पल्लवी श्रीवास्तव — महिला कार्यकम अधिकारी
- प्रा. डॉ. एम. आर. पांडे — सहायक कार्यक्रम अधिकारी
- प्रा. डॉ. बी. एस. चचाने — सदस्य
- प्रा. डॉ. प्रिया मुरारकर — सदस्य
- प्रा. डॉ. वाय. एस. केदार — सदस्य
- प्रा. डॉ. राशी अरोरा — सदस्य

राष्ट्रीय सेवा योजना पथकाव्दारे सत्र २०२०-२१ हया शैक्षणिक सत्रात पुढील प्रमाणे नियमित कार्यकम राबविण्यात आले.

**१) कोव्हीड-१९ व रासेयो व्दारे राबविण्यात आलेले उपक्रम (दि.२४/४/२०२० पासुन आजपर्यंत) :-** चीन मधून सुरूवात झालेला आणि नंतर संपूर्ण जगभर पसरलेला कोरोना व्हायरस म्हणजेच ‘कोव्हीड-१९’ हा एक संसर्गजन्य आजार आहे. या कोरोना विषाणूचा संसर्ग सर्वप्रथम डिसेंबर २०१९ मध्ये चीन मधल्या ‘वुहान’ या शहरात आढळून आला होता. या आजाराचा संसर्ग एका संक्रमित व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे लवकर होत असतो. जागतिक

आरोग्य संघटना म्हणजेच (WHO) या संघटनेने कोरोना व्हायरस मुळे होणाऱ्या या रोगाच्या प्रादुर्भावाला जागतिक महामारी म्हणून घोषीत केले. या रोगाचा संसर्ग झाल्यानंतर काही दिवसांनी याची लक्षणे दिसु लागलीत. कोरोना व्हायरस पासून बचावासाठी आमच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाव्दारे अनेक लोकोपयोगी समाजउपयोगी व देशोपयोगी जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आलेत.

कोरोना व्हायरस संक्रमणापासुन वाचण्यासाठी आपणाला अनेक प्रकारे कशी काळजी घेता येईल यासंबंधी जनजागृती करण्यात आली. त्यामध्ये आपण सार्वजनिक ठिकाणी किंवा गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळणे म्हणजेच सोशल डिस्टंसींग पाळणे, बाहेर जाताना नाकाला तोंडावर मास्क लावणे, हात वेळोवेळी साबणाने स्वच्छ धुणे. बाहेर असतांना सॅनिटायझरचा वापर करणे, आजारी व्यक्तीपासून अंतर राखुन ठेवणे, आपल्या स्वास्थावर लक्ष देणे रोगप्रतिकारशक्ती वाढविणे, कोरोना लस घेणे इत्यादी उपायासंबंधी आमच्या रासेयो स्वयंसेवकांकडून जनजागृती करण्यात आली सध्याही हे जनजागृतीचे कार्यक्रम सुरू आहेत.

कोरोना महामारीमुळे संपूर्ण जग थांबलेला होता व सध्याही आहे. याप्रसंगी सरकारद्वारे कोरोनाला आळा घालण्यासाठी लॉकडाउन लावणे, विविध प्रकारचे निर्बंध लावणे, लसीकरण मोहीम सुरू करणे, कोरोना चाचणी केंद्र उभारणे अशा अनेक उपाययोजना करत आहे.

डॉक्टर, नर्सेस, वार्ड बॉय, पोलीस अधिकारी तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील मंडळी आपला जीव धोक्यात घालून कोरोनाला नियंत्रित करण्यासाठी झटत आहेत. त्यामुळे आपण देखील या परिस्थितीला न डगमगता हवी ती काळजी घेऊन आपण आत्मविश्वास वाढविला पाहीजे. म्हणून आमच्या राष्ट्रीय सेवा पथकाने अनेक लोकोपयोगी, समाजोपयोगी व देशहिताचे अनेक कार्य केले आहेत ते पुढीलप्रमाणे :-

**A) कोरोना व्हायरस संबंधी जनजागृती करणे :-** कोरोना व्हायरस हा एक नवीन व्हायरस आहे. त्यामुळे त्याच्या लक्षणासंबंधी संक्रमणासंबंधीची माहिती पोस्टर, मॅसेज व व्हिडीओ व्दारे विद्यार्थ्यांपर्यंत व विद्यार्थ्यांच्या मार्फत समाजातील लोकांपर्यंत पोहचविण्याचे नियमित कार्य आमच्या एन. एस. एस. च्या विद्यार्थ्यांनी केले. रोज जवळ जवळ ७००० ते १०००० लोकांपर्यंत हे मॅसेज प्रसारित करण्याचे कार्य रासेयो विद्यार्थ्यांनी केले.








**B)** कोरोना महामारीपासुन बचावासाठी मास्क वापरणे, साबुन किंवा सॅनिटायझर ने हात धुणे आवश्यक आहे अशाप्रकारची माहिती Online पध्दतीने मॅसेज, पोस्टर व व्हिडीओच्या मार्फत रोज प्रसारित करण्यात येत होते.








**C)** गरजू व गरीब लोकांना मास्क व सॅनिटाइझर चे वापर करण्यात येत होते. आमच्या रासेयो पथकाव्दारे अंदाजे ४५०० मास्क व गरजू लोकांना सॅनिटाइझर चे वाटप समाजातील गरीब लोकांमध्ये करण्यात आलेत. जे विद्यार्थी ज्या ठिकाणी राहतात त्या परिसरातील व वसाहतीतील लोकांना मदत करण्याचे आव्हान आम्ही रासेयो स्वयंसेवकांना करत होतो. काही विद्यार्थ्यांनी स्वतः तयार मास्क केले व गरजू व गरिब लोकांना वितरीत केले.














**D)** आरोग्य सेतु ॲप डाउनलोड करण्यास मदत करणे. समाजातील तांत्रीकदृष्टया अशिक्षित व्यक्तींना आरोग्य सेतु ॲप डाउनलोड करण्यास मदत केली व कोरोना व्हायरसची माहिती कशी प्राप्त करता येते. याची माहिती Arogya सेतू ॲपनी मिळते. अंदाजे ६००० पेक्षा अधिक लोकांना रासेयो स्वयंसेवकांनी Arogya सेतू ॲप Download करण्यास मदत केली.





**E)** कोरोना काळात धान्य वाटप केंद्रावर व औषध दुकानात कोरोना योध्दा म्हणून मदत करण्याचे कार्य आमच्या रासेयो पथकातील १० स्वयंसेवकांनी केले.

**F)** कम्युनिटी किचन मध्ये शिजलेल्या अन्नाचे पॅकेट तयार करण्यास मदत करण्याचे कार्य रासेयो स्वयंसेवकांनी स्वयंप्रेरणेने व स्वइच्छेने केले. ही कम्युनिटी किचन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठाच्या एन.एस.एस. सेल व शहरातील इतर सामाजिक संस्था व्दारे आयोजित करण्यात आले होते.

**G)** कोरोना काळात कोरोना विषयावर आयोजित प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये भाग घेऊन कोरोना पासुन बचाव करण्याची माहिती प्राप्त करण्यात आली यात अंदाजे ७०-८० विद्यार्थ्यांनी सतत सहभाग घेतला. ती माहिती समाजामध्ये Online माध्यमांनी प्रसार करून जनजागृती केली.

**H) गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण :-** कोरोना काळात संपूर्ण शाळा महाविद्यालये बंद ठेवण्यात आलीत व आजही बंद आहेत हयामुळे गरिब विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान झाले. जे मोबाईल घेवु शकत नाही, अशा विद्यार्थ्यांचा नुकसान होवु नये म्हणून अशा गरीब विद्यार्थ्यांना आमच्या रासेयो स्वयंसेवकांनी मोफत शिक्षणाचे धडे विद्यार्थ्यांनी झाडाखाली, सार्वजनिक जागेत, समाजमंदिरात केलेले आहेत व आजही गरिब विद्यार्थ्यांचे शिक्षण मोफत देण्यात येत आहे. हयामध्ये प्रामुख्याने सचिन साहु, लखन रामटेके, आस्तीक परिहार, जय खापरे, अपेक्षा हुमने, पल्लवी देवगीरकर यांनी केले. त्याबद्दलचे त्यांचे हार्दीक अभिनंदन.





**I) ऑनलाईन शिक्षण व परिक्षेसंबंधी जनजागृती :-** कोरोना महामारीमुळे विद्यार्थ्यांना शाळेत शिक्षण घेणे किंवा महाविद्यालयात शिक्षण घेणे अशक्य झाले व त्याची जागा मोबाईलने घेतली अशावेळेस ऑनलाइन शिक्षण, युनीट टेस्ट, होम असाईमेंट, Online परिक्षा इत्यादीसंबंधी जनजागृती आमच्या रासेयो स्वयंसेवकांनी ऑनालाईन पध्दतीने केली व आजही करीत आहेत.

**J) कोरोना लसीसंबंधी जनजागृती :-** कोरोना ला आळा घालायचा असेल किंवा त्याचेवर पूर्णपणे विजय मिळवायचा असेल तर कोरोना लसीचे 100% लसीकरण झाले पाहिजे. परंतु कोरोना लसीबाबत समाजातील लोकांमध्ये अनेक भ्रम होते व आजही आहेत. ते दूर करण्यासाठी महाविद्यालयाच्या रासेयो समितीकडून सेमीनार घेण्यात आले व त्यांच्या शंकाचे निराकरण करण्यात आले. व पोस्टर, मॅसेज व व्हिडीओच्या मार्फत लोकांमधील व्याप्त भ्रम दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आले व आजही कोरोना लसीबाबतची जनजागृती सुरू आहे.






















**K) मातृसंस्था शिक्षा मंडळ वर्धा व्दारे मोफत कोरोना लसीकरण :-** आमची मातृ संस्था शिक्षा मंडळ, वर्धा व बजाज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गो. से. अर्थ-वाणिज्य महाविद्यालय, नागपूर मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तसेच कर्मचारी प्राध्यापकांसाठी व त्यांचे कुटुंबीयांसाठी मोफत कोरोना लसीचे व्यवस्था करण्यात आली. यात अनेक विद्यार्थ्यांनी तसेच कर्मचारी व प्राध्यापकवर्ग त्यांचे कुटुंबियांनी कोरोना लसीचा लाभ घेतला. याच्या जनजागृतीचे कार्य महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसेवकांनी केले.


COVID - 19 VACCINATION PROGRAMME
The Bajaj Group


SHIKSHA MANDAL'S
C. S. COLLEGE OF COMMERCE & ECONOMICS, NAGPUR

SHIKSHA MANDAL'S
NAGPUR

NAGPUR

SHIKSHA MANDAL'S
C. S. COLLEGE OF COMMERCE & ECONOMICS, NAGPUR

SHIKSHA MANDAL'S
C. S. COLLEGE OF COMMERCE & ECONOMICS, NAGPUR

SHIKSHA MANDAL'S
C. S. COLLEGE OF COMMERCE & ECONOMICS, NAGPUR


SHIKSHA MANDAL'S
C. S. COLLEGE OF COMMERCE & ECONOMICS, NAGPUR


SHIKSHA MANDAL'S
C. S. COLLEGE OF COMMERCE & ECONOMICS, NAGPUR

SHIKSHA MANDAL'S
C. S. COLLEGE OF COMMERCE & ECONOMICS, NAGPUR

SHIKSHA MANDAL'S
C. S. COLLEGE OF COMMERCE & ECONOMICS, NAGPUR

SHIKSHA MANDAL'S
C. S. COLLEGE OF COMMERCE & ECONOMICS, NAGPUR







# Shiksha Mandal organizes Covid vac nation drive for G.S. College at OCHI

## First Central Indian Education trust to undertake free vaccination for their studer

Govindram Seksaria College of Commerce and Economics, Nagpur was established in 1945 by Shiksha Mandal, Wardha to fulfill the requirement of Commerce education in the region during the pre-Independence period. It is the first Commerce College in the city of Nagpur and only the second in Nagpur University: the first being G. S. College of Commerce Wardha. Firmly believing that vaccination is the only key to control this pandemic, Shiksha Mandal patronized by Bajaj Group had proactively decided to bear the cost of Covid vaccination for all their beneficiaries including staff and students in all their education Institutions. Nagpur based Orange City Hospital & Research Institute, a unit of Ravi Nair Hospitals Private Limited that had set an ideal by ensuring zero vaccine dose wastage and maximum efficiency was selected by prestigious nationally acclaimed industrial group namely Bajaj Group as their vaccination partner. Respecting the nationalistic spirit of Bajaj Group, RNHPL management



decided to charge only Rs.1 vaccination even though Government had stipulated Rs. facilitator charges. This vac drive was commenced on 10 2021 at OCHRI to commemo birthday of Shri Rahul Bajaj in p of Shri Sanjay Bhargava, Ch Shiksha Mandal- Shri Udaybhaskar Nair- RNHPL Chairman, Dr. Us Dr. Vidya Nair- RNHPL Directors, Dr. N.Y. K Principal - G.S. College of Commerce and Dr. Anu OCHRI Director, Dr. Noorul Ameen and Shri P Tichkule are leading teams of Shri Neeraj P Febamol, Sr. Rahel Patrange, Shri Sawant Wa Shri Ganesh Iyer Shri Avinash Ganar for succes drive. All public sector undertaking, Banks, In groups and education trusts who are similarly in proactively undertake Covid vaccination as well patriotic measure for their beneficiaries may conn OCHRI.

**२) Spit Free India Movement मध्ये रासेयो स्वयंसेवकांचा सहभाग दि. १/५/२०२० ते ३१/१२/२०२० :-** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व सम्बंध फॉउंडेशन दिल्ली व्दारे आयोजीत “Spit Free India Movement” Online कार्यक्रमामध्ये आमच्या महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांनी दि. १/५/२०२० ते ३१/१२/२०२० पर्यंत सक्रीय सहभाग घेवुन जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला व धुंकल्याने कोरोना वायरसचा अधिक वेगाने प्रसार होतो व हे आपण सर्वांच्या आरोग्यास अधिक घातक आहे. हे पटवून देण्यात यशस्वी प्रयत्न करण्यात आले.

या बहुमुल्य यशस्वी कार्यासाठी रासेयो स्वयंसेवक सचिन साहु, रासेयो स्वयंसेविका इरफाना पठान यांना सम्बंध फाउंडेशन दिल्ली तर्फे ब्रॉन्ज मेडल व सन्मानपत्र देवून सन्मानित करण्यात आले. तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. ए. बी. पटले यांच्या यशस्वी नेतृत्वासाठी ब्रांच मेडल व सन्मान पत्र देवून गौरविण्यात आले. यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत व इतर प्राध्यापक वर्गांनी त्यांचे अभिनंदन केले.














**३) योग दिवस :- दि. २१ जुन २०२० रोज शनिवार :** गो. से. अर्थ वाणिज्य महाविद्यालयामध्ये योग समिती, क्रिडा समिती आणि राष्ट्रीय सेवा योजना समितीअंतर्गत २१ जुन २०२० ला आंतरराष्ट्रीय योग दिवस Online पध्दतीने साजरा करण्यात आला. यामध्ये जवळ जवळ NSS चे ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून योग शिक्षक प्रा. आशुतोष तिवारी यांनी योगासन आणि प्राणायमचे महत्व सांगीतले. तसेच आरोग्याच्या रोजगाराच्या दृष्टिने योगासन किती महत्वाचे आहे. हे सांगीतले या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रम शिस्तबध्द व उत्साहात आणि कोवीड-१९ नियमांचे पालन करून साजरा करण्यात आला व योग बद्दल संदेश देण्यात आला.

“जर प्रत्येकानी नियमित योग केला तर आपला देश हा आजार मुक्त होईल.” असे आव्हान प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत यांनी उपस्थितांना केले.





**४) वृक्ष दिंडी : २ जुलै २०२० रोज गुरूवार वृक्षसंवर्धनावर Online Programme :-**

“झाडे लावा, झाडे जगवा” हा संदेश आणि याबरोबरच ‘वृक्षवल्ली आम्हा सोयरी’ तुकोबाचा संदेश देण्यासाठी महाविद्यालयाच्या NSS विभागातर्फे वृक्ष संवर्धन कार्यक्रमाचे’ Online आयोजन करण्यात आले. यामध्ये वर्तमान परिस्थिती आणि भविष्यासाठी झाडे किती महत्वाचे आहे याचे महत्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. ए. बी. पटले तसेच समिती सदस्य उपस्थितीत होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी स्वतःच्या घरी व शेतामध्ये एक झाड अवश्य लावावे असे आव्हान करण्यात आले व या आव्हानाला सर्व विद्यार्थ्यांनी सकारात्मक समर्थन दिले.













**५) जागतिक लोकसंख्या दिवस ११ जुलै २०२० रोज शनिवार :-** ‘राष्ट्रीय सेवा योजना’ विभागाअंतर्गत ११ जुलै ला ‘जागतिक लोकसंख्या दिवस’ Online माध्यमाने साजरा करण्यात आला. यामध्ये “वाढती लोकसंख्या देशाच्या व समाजाच्या विकासात अडथळा”, या विषयावर विद्यार्थ्यांमध्ये Online वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये सात (७) विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यास्पर्धेचा प्रथम बक्षिस श्वेता कैथवास, व्दितीय शुभांगी नाडेकर तर तृतीय बक्षिस अपेक्षा हुमणे हयांना देण्यात आले.




**६) online ‘पर्यावरण संरक्षण’ कार्यक्रम :- दि. २३ जुलै २०२० रोज गुरुवार :-** या दिवशी ‘राष्ट्रीय सेवा योजना’ विभागाअंतर्गत ‘पर्यावरण संरक्षण’ या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात

आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले व घरी, स्वतःच्या शेतामध्ये झाडे लावण्याचे संकल्प केले. हयाप्रसंगी ८० रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.











**७) online माध्यमाने कारगिल विजय दिवस : दि. २६ जुलै २०२० रोज रविवार :** 'कारगिर विजय दिवस' या दिवशी विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम जगावे आणि भारतीय सैनिकांसाठी संवेदना वाढाव्या, विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम वाढावे, हया उद्देशाने Online माध्यमाने Video व्दारे विद्यार्थ्यांना भारतीय सैनिकांची विजय गाथा सांगण्यात आली.








**८) Online माध्यमाने 'जागतिक शांती दिवस' : दि. ६ ऑगस्ट २०२० रोज गुरूवार :-** गो. से. अर्थ वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा विभागा व्दारे Online माध्यमाने (Campaigning Against Nuclear weapon Day) हा दिवस साजरा करण्यात आला. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना Nuclear weapon चे भीषण दुष्परिणाम काय होतात व भविष्यात

काय होऊ शकतात याबद्दलची माहिती देण्यात आली. यापुढे अश्या घटनाची पुनरावृत्ती नको यासाठी सर्वांनी याच्या विरोधात सदैव उभे राहू असा संकल्प केला. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक रेबन्त परियार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. ए. बी. पटले यांनी मार्गदर्शन केले आणि त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना शांततेचा संदेश दिला. या Online कार्यक्रमा मध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागा चे १०० विद्यार्थी सहभागी झाले होते.

**९) Online माध्यमाने जागतिक युवा दिवस कार्यक्रम : दि. १२ ऑगस्ट २०२० रोज बुधवार : -** गो. से. अर्थ वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'जागतिक युवा दिवस' कार्यक्रम Online माध्यमाने साजरा करण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. ए. बी. पटले यांनी मार्गदर्शन केले. आणि तरूनांना संघर्ष करण्याची व नवे आव्हाने स्विकारण्याची प्रेरणा दिली. प्रत्येक विद्यार्थ्याने संघर्षाचा व आव्हानाचा सामना अतिशय ठामपणे करायला सांगीतले त्याचसोबत देशाचे हितासाठी कार्य करावे, देशाला कुठल्याही प्रकारे हानी होईल असे कृत्य करू नये असे आव्हान केले. या बरोबरच राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक सचिन साहू याने "देश निर्माण मध्ये युवकांची भूमिका" संदेश PPT व्दारे सादर केला. यावर एक सदर कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे ९२ विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाची सांगता रासेयो स्वयंसेवीका अपेक्षा हुमने यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.









**१०) स्वातंत्र दिवस कार्यक्रम : दि. १५ ऑगस्ट २०२० रोज शनिवार :-** 'स्वातंत्र्य दिन' १५ ऑगस्ट या दिवशी गो. से. अर्थ वाणिज्य महाविद्यालयामध्ये सकाळी ७.४७ वाजता झेंडा

वंदन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत यांनी झेंडा फडकविला व मानवंदना दिली. याप्रसंगी विद्यार्थ्यांना आप-आपल्या परिसरातील शाळा, संस्थामध्ये उपस्थित राहण्याचे सांगण्यात आले होते. सुचनेला मान देवुन NSS विभागाचे विद्यार्थ्यांनी आपआपल्या भागातील शाळा व इतर संस्थामध्ये उपस्थिती दर्शविली.







**११) स्वच्छता पखवाडा कार्यक्रम :- (१/८/२०२० ते १७/८/२०२०) :-** महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांनी स्वतःच्या घरी परिसरात दि. १/८/२०२० ते १७/८/२०२० पर्यंत स्वच्छता पखवाडा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या स्वतःच्या घरासमोर परिसर सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करावी व ती नियमित स्वरूपात सुरू ठेवावी असे आव्हान







करण्यात आले. व रासेयो स्वयंसेवकांनी ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.

या दरम्यान प्रत्येक रासेयो विद्यार्थ्याने आपल्या घरी, शेतामध्ये अथवा रस्त्याच्या कडेला किंवा इतर सार्वजनिक ठिकाणी एक वृक्ष लावावे व त्याची फोटो रासेयो कार्यालयात पाठवावी अशी सुचना करण्यात आली होती. रासेयो विद्यार्थ्यांनी हया सुचनांचे पालन करून रासेयो स्वयंसेवकांव्दारे १५० झाडे लावण्यात आली व त्याची जबाबदारी स्विकारण्यात आली.

**१२) नविन रासेयो स्वयंसेवकाची Online माध्यमाने नोंदणी :- दि. २०/८/२०२० ते १५/१०/२०२० पर्यंत :-** राष्ट्रीय सेवा योजना विभागामध्ये नविन रासेयो स्वयंसेवकाची Online माध्यमाने नोंदणी कार्यक्रमाला रितसर सुरुवात करण्यात आली. रासेयो नोंदणी प्रक्रियेसाठी १५ दिवस ठेवण्यात आली आणि यामध्ये २७० नविन विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. या कार्यात जुन्या सर्व स्वयंसेवकानी नविन स्वयंसेवकाचे मार्गदर्शन केले. व राष्ट्रीय सेवा योजना विभागात नाव नोंदविण्यास प्रेरित केले. हे कार्य अतिशय उत्कृष्ठ पणे पार पाडण्यात आले. यामध्ये नवीन रासेयो स्वयंसेवकाचा उत्साह मोठया प्रमाणात दिसुन आला.

**१३) Online माध्यमाने राष्ट्रीय सेवा योजना मार्गदर्शन सभा : १९ ऑगस्ट २०२० रोज गुरुवार :-** गो.से. अर्थ वाणिज्य महाविद्यालयामध्ये रा.से.यो. विभागातर्फे मार्गदर्शन सभा घेण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांना एन.एन.एस. संबंधी जुन्या विद्यार्थ्यांना वर्तमानातील समाजात व्याप्त ज्वलंत सामाजिक प्रश्नांचा विषयावर बोलण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. विद्यार्थ्यांकडून हया सुचनेची पूर्तता करण्यात आली हया प्रसंगी सचिन साहू, लखन रामटेके, रितिक सिरभैये, श्वेता बोरकर, ज्योती पयासी, रेशमा ठाकरे हया रासेयो स्वयंसेवकांनी वर्तमान काळातील ज्वलंत सामाजिक विषयावर आपले विचार व्यक्त केले. यानंतर कार्यक्रम अधिकारी डॉ. ए. बी. पटले यांनी मार्गदर्शन केले, आणि रा.से.यो. (NSS) ची संकल्पना काय आहे, देशाच्या प्रगतीमध्ये एन.एस.एस. चे कोणते योगदान आहे, आणि कसे हयासंबंधी चे मार्गदर्शन केले. हयाप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व समिती सदस्य प्रा. पल्लवी श्रीवास्तव व डॉ. मनोज पांडे हे उपस्थित होते.




**१४) Online माध्यमाने शिक्षक दिवस कार्यक्रमाचे आयोजन :- ५ सप्टेंबर २०२० रोजी शनिवार :-** भारताचे माजी राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म दिवस 'शिक्षक दिवस' म्हणून Online माध्यमाने साजरा करण्यात आला. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची अतिशय प्रतिभावंत शिक्षक म्हणून त्यांची ओळख होती. याप्रसंगी रेषमा पांडे हिने शिक्षिका प्रती आपले मनोगत व्यक्त केले.

**१५) मार्गदर्शन आणि नियोजन सभेचे आयोजन :- दि. १९/९/२०२० :-** सर्व नविन स्वयंसेवकांसाठी मार्गदर्शन व वार्षीक नियोजन सभेचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना (NSS) काय आहे? आणि रासेयो पथक कशा प्रकारे कार्य करते? हे पूर्णपणे PPT व्दारे मार्गदर्शन करण्यात आले आणि नवीन रासेयो स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेची संकल्पना सांगण्यात सांगण्यात आली. तसेच त्यांच्या मनामधील सर्व प्रश्नांचे निराकरण करण्यात आले. आणि वार्षीक कार्यक्रमाची माहीती देवून वार्षिक कार्यक्रमांचे नियोजन सांगण्यात आले. यामध्ये कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी. पटले आणि



डॉ. एम. आर. पांडे, प्रा. पल्लवी श्रीवास्तव व इतर प्राध्यापक वर्गाची उपस्थिती होती.

**१६) राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस :- २४ सप्टेंबर २०२० रोजी :-** राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्थापना दिनानिमीत्त गो.से. अर्थवाणिज्य महाविदयालयाच्या रा.से.यो. विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या मध्ये रा.से.यो. च्या ७७ विदयार्थ्यांनी सहभाग घेतला. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी. पटले यांचे मार्गदर्शनात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत यांनी रा.से.यो. विभागाच्या कामाची प्रशंसा केली. राज्य स्तरीय पुरस्कार विजेता शुभम चाफले यांनी आपले अनुभव आणि रा.से.यो. चा प्रवास एका सामान्य विदयार्थ्यां पासून राज्यस्तरीय उत्कृष्ट स्वयंसेवकांपर्यंतचा प्रवास सांगितला आणि रा.से.यो. विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना झाडे लावण्याचे व त्यांचे संवर्धन करण्यासाठी रासेयो तर्फे त्यांना एक-एक झाड देण्यात आले. एकूण ७० झाडे विद्यार्थ्यांना स्वतःच्या घरी, शेतामध्ये अथवा सार्वजनिक मोक्याचे ठिकाणी लावण्यासाठी देण्यात आले. यात आंबा, पाम, कडूनिंब, जांभूळ, चिकू इत्यादी झाडाचे वितरण करण्यात आले.






**१७) Say No to Plastic कार्यक्रमाचे चे आयोजन :- ३०/९/२०२० रोजी बुधवार "प्लॅस्टिक चा वापर थांबवा'** (Say No to Plastic) 'प्लास्टिक चा निषेध' या विषयावर Online माध्यमाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हयाप्रसंगी कार्यक्रम अधिकारी डॉ.ए.बी. पटले यांनी कार्यक्रमाची पार्शभूमी समजावुन सागितली. व प्लॅस्टिक चा उपयोग करू

नका असे आव्हान करण्यात आले. या सभेमध्ये Say No to Plastic या कार्यक्रमा बद्दल विस्तृत माहीती डॉ. ए. बी. पटले यांनी सांगीतले.





**<u>१८) राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती : कार्यक्रम: -</u>**


**(अ)** ०२ ऑक्टोबर, २०२० रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. खंडाईत यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि श्री. लालबहादूर शास्त्री यांच्या फोटोला माल्यार्पण करून आदरांजली वाहण्यात आली. प्राध्यापकांनी स्वच्छतेची शपथ घेतली.






**(ब) online माध्यमाने व्यसनमुक्ती कार्यशाळा :- २/१०/२०२० रोजी रविवार.** गो.से. अर्थ वाणिज्य महाविदयालयाचे रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी. पटले, प्रा. पल्लवी श्रीवास्तव व रासेयो विदयार्थी प्रतिनिधी म्हणुन सचिन शाहु यांनी PPT व्दारे व्यसनाचे वाईट


परिणाम कसे कसे असतात. आपल्या देशात याचे प्रमाण किती ? याचा आहारी जाणारे व्यक्ती प्रत्येक वर्षाला किती ? बळी पडणारे व्यक्ती किती? याची विस्तृत महिती देण्यात आली. या व्यसनांना कसा आळा घालता येईल यासंबंधी माहिती देण्यात आली. यावर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उत्कृष कार्ये करावे यासंबंधी प्रा. डॉ. ए.बी. पटले व प्रा. पल्लवी श्रीवास्तव यांनी प्रोत्साहानपर मार्गदर्शन केले. महाविद्यालयात वेगवेगळया कार्यक्रमाअंतर्गत व्यसनांना कसा आळा घालता येईल यासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले. आणि उपस्थित सर्वांनी “Tobacco free India" 'शपथ' घेतली व महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांकडून अशी शपथ घेण्याची सुचना करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांनी ‘‘मी व्यसन करणार नाही, व कोणाला करू देणार नाही' अशी शपथ घेतली. या कार्यक्रमामध्ये रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी. पटले, डॉ. मनोज पांडे आणि प्रा. पल्लवी श्रीवास्तव उपस्थित होते.




**१९) (नॅशनल युनिटी डे) राष्ट्रीय एकता दिवस कार्यक्रमाचे आयोजन (दि. ३१/१०/२०२०) :-** भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती कार्यक्रम महाविद्यालयात सोशल डिस्टेंसिंग च्या नियमांचे पालन करून साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत, IQAC को-ऑडीनेटर डॉ. रंजना साहु, विशेष दिवस आयोजन समिती संयोजिका डॉ. नेहा कल्याणी, एम.बी.ए. संयोजिका डॉ. अश्विनी पुरोहीत, एम. कॉम. कोर्स प्रमुख डॉ. शुभांगी मोरे, पदवी कोर्स प्रमुख डॉ. विशाल ठणगन, बी.सी.सी.ए. प्रमुख प्रा. प्रविण यादव उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ.एन. वाय. खंडाईत यांनी नॅशनल युनिटी डे बद्दल आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार आभार रासेयो प्रमुख डॉ.ए.बी.पटले यांनी केले. कार्यक्रमाला २० विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग व कर्मचारी सहभागी झाले होते.







**२०) संविधान दिवस कार्यक्रम दि. २६ नोव्हेबर २०२० :-** दि. २६ नोव्हेबर २०२० रोजी महाविद्यालयात रासेयो पथकाचे वतीने "संविधान दिवस' कार्यक्रम साजरा करण्यात आला. हया प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.वाय. खंडाईत, IQAC को-ऑर्डीनेटर डॉ. रंजना साहु, डॉ. नेहा कल्याणी यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून आंदराजली अर्पित केली याप्रसंगी प्राचार्य डॉ. एन.वाय. खंडाईत यांनी उपस्थितीतांचे मार्गदर्शन केले. आणि संविधान उद्देशिका चे वाचन केले. याप्रसंगी राष्ट्रीय एकात्मता व अखंडता व निष्ठा जपण्याची शपथ घेतली. प्रा. डॉ. ए.बी. पटले यांनी कार्यक्रमाचे संचालन व आभार व्यक्त केले. हयाच दिवशी रासेयो च्या २० विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने online माध्यमाने आयोजित संविधान दिवस कार्यक्रमामध्ये सहभाग घेतला.




**२१) Online माध्यमाने रेड रिबन क्लब अंतर्गत कार्यक्रमांचे आयोजन :-** दिनांक १ डिसेंबर २०२० एच.आय.व्ही. एड्स या गंभीर आजाराबद्दल जन जागृती निर्माण व्हावी यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाने RRC (Red Ribbon Club) च्या अंतर्गत Video च्या माध्यमाने जनजागृती करण्यात आली व Online माध्यमाने कार्यक्रम दि. १ डिसेंबर २०२० ला घेण्यात आले. आणि यामध्ये एच.आय.व्ही. एड्स संबंधी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. या कार्यक्रमात ८० रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.






या कार्यक्रमामध्ये रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी.पटले, रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. पल्लवी श्रीवास्तव आणि ECA संयोजिका डॉ. नेहा कल्याणी उपस्थित होते. उपस्थित विद्यार्थ्यांनी अतिशय छान प्रतिसाद देवुन HIV Aids या गंभीर आजाराची सर्व माहिती जाणुन घेतली.

**२२) online पध्दतीने राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण जनजागृती :-** दि. २/१२/२०२० रोजी Online पध्दतीने राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी व्हिडीओ माध्यमाने विद्यार्थ्यांमध्ये प्रदूषणाची माहिती देण्यात आली. व प्रदुषण आरोग्यासाठी, समाजासाठी, देशासाठी कसा घातक आहे हे समजवून देण्यात आले. या कार्यक्रमाला ७९ विद्यार्थी उपस्थित होते.







**२३) व्हिडीओ माध्यमाने विजय दिवस कार्यक्रम दि. १६/१२/२०२० :-** दि. १६/१२/२०२० ला Online माध्यमाने व्हिडीओव्दारे विजय दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना व्हिडीओ आणि PPT च्या माध्यमाने विजय दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी ८० रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.








**२४) Online पध्दतीने अल्पसंख्याक अधिकार दिवस (दि. १८/१२/२०२०) :-** महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाव्दारे दि. १८/१२/२०२० ला राष्ट्रीय अल्पसंख्याक अधिकार दिवस Online पध्दतीने साजरा करण्यात आला. याप्रसंगी रासेयो संयोजक डॉ. ए. बी.पटले, यांनी यांनी रासेयो स्वयंसेवकांना अल्पसंख्याक अधिकार दिवसाचे महत्व सांगितले. आपण सर्वांनी संविधानाने दिलेल्या अधिकाराचे व कर्तव्याचे पालन करावे असे सांगितले याप्रसंगी ८६ रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.








**२५) Online पध्दतीने सुशासन दिवस कार्यक्रम दि. २५/१२/२०२० :-** माजी प्रधानमंत्री अटलबिहारी बाजपेयी यांचा जन्मदिवस ''सुशासन दिवस' म्हणून ऑनलाइल माध्यमाने साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना सुशासन दिवसाची माहिती online व्हिडीओ व्दारे व PPT व्दारे देण्यात आली.







**२६) सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम दि. ४/०१/२०२१ :-** ऑनलाईन माध्यमाने सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी पल्लवी देवगीरकर, अहिंसा उके, ऐश्वर्या गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला डॉ. नेहा कल्याणी, प्रा. पल्लवी श्रीवास्तव, रासेयो संयोजक डॉ. ए. बी. पटले उपस्थित होते.





**२७) माझी वसुंधरा कार्यक्रम :-** दि. १२/१/२०११ ते १५/१/२०२१ पर्यंत महाराष्ट्र शासन पर्यावरण मंत्रालयाच्या निर्देशानुसार माझी वसुंधरा या कार्यक्रमात जास्तीत जास्त महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसेवक व इतर विद्यार्थ्यांना सहभागी करण्यात आले. तसेच प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग यांनाही या कार्यक्रमात सहभागी करण्यात आले व पर्यावरणाचे संरक्षणासाठी शपथ घेतली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ECA संयोजिका डॉ. नेहा कल्याणी यांनी मार्गदर्शन केले.

**२८) Food Planet Health कार्यक्रमाचे Online आयोजन दि. २०/१/२०२१:-** रासेयो विभाग व वेगन ऑऊटरिच (Vegan Outreach) संस्था नवी दिल्ली यांच्या संयुक्त माध्यमाने Food Planet Health या विषयावर Webinar आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी Outreach संस्था संयोजिका आस्था गुप्ता व त्यांच्या टीमद्वारे प्राण्याच्या-जनावरांच्या आहाराबद्दल खुप उपयुक्त माहिती दिली व विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांची उत्तरे दिली व विद्यार्थ्यांचे समाधान केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे रासेयो विभागाच्या १९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना E-Certificate प्राप्त झाले.










**२९) Online राष्ट्रीय मतदार दिवस कार्यक्रम :- (दि. २५/१/२०२१) :** राष्ट्रीय सेवा योजना समितीतर्फे दिनांक २७/१/२०२१ रोज सोमवार ला सकाळी online माध्यमाने "राष्ट्रीय मतदार दिवस" साजरा करण्यात आला याप्रसंगी जिल्हा निवडणूक कार्यालय, नागपूर चे अधिकारी श्री. नितेश सोनोने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्यांनी संभाव्या नवीन मतदारांना माहिती दिली की या कोरोना काळात आपण आपले नाव मतदार यादीत Online माध्यमाने कसे नोंदवू शकsतो तसेच नावातील दुरूस्ती, मतदार यादीतुन नाव वगळणे, जोडणे तसेच विद्यार्थ्यांच्या इतर महत्वपूर्ण प्रश्नांचे उत्तर देवून त्यांच्या शंका व कुशंकाचे निराकरण केले व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी Online माध्यमाने आपले नाव मतदार यादीत नोंदवावे असे आव्हान केले.

याप्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी.पटले यांनी यांनी कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे संचालन केले. कार्यक्रमाला महिला अधिकारी प्रा. पल्लवी श्रीवास्तव उपस्थित होते तसेच विद्यार्थ्यांनी मोठया संख्येत उपस्थितीत राहुन कार्यक्रमाचा लाभ घेतला.






**३०) गणतंत्र दिवस कार्यक्रमात सहभाग :- (दि. २६/१/२०२१)** दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुध्दा गणतंत्र दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. WHO च्या नियमांचे पालन करून झेंडा वंदन कार्यक्रम करण्यात आला. झेंडा वंदन कार्यक्रम सकाळी ठिक ७.४७ वाजता करण्यात आले. या कार्यक्रमात प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग आणि एनएसएस चे २७ विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एन.वाय. खंडाईत यांच्या हस्ते झेंडा फडकविण्यात आला. प्राचार्यांनी झेंडा वंदन करून उपस्थितीला मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन विशेष दिवस आयोजन समिती संयोजिका डॉ. नेहा कल्याणी यांनी केले.

**३१) प्लस पोलिओ (Pulse Polio) कार्यक्रमात सहभाग (दि. ३१/१/२०२१) :-** भारत सरकार व्दारे आयोजित प्लस पोलिओ कार्यक्रमामध्ये आमच्या महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांनी नागपूरच्या वेगवेगळया सेंटरवर आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना मदत केली. यामध्ये एकूण सात रासेयो स्वयंसेवकांनी (सचिन साहु, लखन रामटेके, अस्तिक परिहार, श्वेता



कैथवास, पिपक नारलवार, अपेक्षा हुमने, अंजली जामगडे) सहभाग नोंदविला. आरोग्य विभागातील कर्मचारी तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी. पटले यांनी त्यांच्या कार्याची प्रशंसा केली.






**३२) Online माध्यमाने रस्ता सुरक्षा कार्यक्रम :- दिनांक १८/१/२०२१ ते १७/२/२०२१ :-** आमच्या महाविद्यालयातील रासेयो विभागाव्दारे दि. १८/१/२१ ते १७/२/२०२१ महिना हा एक “रस्ता सुरक्षा अभियान” अंतर्गत online कार्यक्रम घेण्यात आले. व विद्यार्थ्यांनी PPT द्वारे आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी डॉ. ए.बी.पटले आणि इतर कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी हया Online कार्यक्रमामध्ये सहभागी झाले. तसेच विद्यार्थ्यांची पोस्टर बॅनर व व्हिडीओ तयार ते समाजातील लोकांपर्यंत पोहचवून समाजाची जनजागृती करण्यात आली.





**३३) Online छत्रपती शिवाजी महाराज जयंती :- (दि. १९/२/२०२१)** महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना समिती व विशेष दिवस कार्यक्रम आयोजन समिती च्या संयुक्त विद्यमानाने Online Google Meet व्दारे हिंदवी स्वराज्य चे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी आरती बिसेन, स्वर्णा सराटे, शुभांगी नाडेकर यांनी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन विशेष दिवस आयोजन समिती संयोजिका

डॉ. नेहा कल्याणी यांनी केले. प्रमुख वक्ता म्हणून डॉ. ए. बी. पटले यांनी मार्गदर्शन केले आणि रासेयो स्वयंसेवक लखन रामटेके यांनी आभार प्रदर्शनाचे कार्य केले. कार्यक्रमाला ९८ विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.












**३४) Online National Webinar on "The Role of Youth in Water & Environment Conservation" (Date 22/2/2021) :-** महाविद्यालयाच्या रासेयो आणि IQAC समितीव्दारे आयोजित सेमिनार श्रृखंलेअंतर्गत दि. २२/२/२०२१ रोजी महाविद्यालयात Online National Webinar on "The Role of Youth in water & Environment Conservation" या विषयावर रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. ए. बी. पटले यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या संबोधनातून भविष्यात पाण्याचे व वातावरणाचे महत्व उपस्थितांना पटवून दिले. आणि आपण पाण्याचे संचय कसे करावे, पाण्याची नासधूस कशी टाळावी व पाण्याचे वर्तमान उपलब्धता या विषयावर आपले विचार व्यक्त केले. तसेच प्रदूषणापासून वातावरण कसे सुरक्षित राहील यासंबंधी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रम दीड तास चालला.






या कार्यक्रमात देशातील विविध विद्यापीठाचे व महाविद्यालयाचे विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. सदर चर्चासत्रात एकूण २८९ विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा. डॉ. एम. आर. पांडे यांनी बघितले, तांत्रीक बाबी प्रा. अश्विनी सकलकाळे, प्रा. आकाश जैन, डॉ. नेहा कल्याणी यांनी बघितले.

उपस्थितीत सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्राध्यापकांना E -Certificate देण्यात आले.

सदर कार्यक्रमाची प्रशंसा प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत यांनी केले.

**३५) Online माध्यमाने जागतिक महिला दिवस कार्यक्रम दि. ८/३/२०२१ :-** जागतिक महिला दिवस कार्यक्रमाचे औचित साधुन विशेष दिवस आयोजन समिती आणि रासेयो विभागातर्फे Online माध्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले व महिलांबद्दल आदर, सन्मान करावा असे मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.ए.बी.पटले उपस्थित होते.









**आभार :**

सत्र २०२०-२१ मध्ये कोरोना महामारीमुळे अधिकांश कार्यक्रम Online माध्यमाने घेण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे विविध समाजोउपयोगी देशोपयोगी नियमीत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रासेयो स्वयंसेवक सचिन साहु, लखन रामटेके, रेबंत परियार, आस्तिक परिहार, जय खापरे, इरफाना शेख, दिगंबर नागपूरे, रियाझ पठान, प्रियंका अलोने, रितिक सिरभैये, सिद्धांत सहानी, अपेक्षा हुमणे, अंजली, आचाल साहु, गौरी दुर्गे, पिंकी मोहबिया, ज्योती पयासी, दिपाली दहिकर, अहिंसा उके, साक्षी तांबे, श्वेता कैथवास ऑचल लिप्टे, सृष्टी निमकर, प्रेरणा सुरमपाली, शिवानी मिश्रा, योगिता बांगडकर, स्वर्णा सराटे, नरेंद्र सिंग, पंकज खाडे, अभिलाषा पटले, गुंजन बरेकर, आरती बिसेन, रविंद्र ठाकूर, सत्यम तिवारी यांचे सहकार्य लाभले.

तसेच राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. पल्लवी श्रीवास्तव, डॉ. एम. आर. पांडे, डॉ. बि. एम. चचाने, डॉ. प्रिया मुरारकर, डॉ. राशी अरोरा, डॉ. वाय. एच. केदार, यांचे सहकार्य प्राप्त झाले. तसेच IQAC को-ऑडीनेटर डॉ. रंजना साहु, विशेष दिवस आयोजन समिती संयोजिका डॉ. नेहा कल्याणी, एम.कॉम. कोर्स संयोजिका डॉ. शुभांगी मोरे, पदवी कोर्स संयोजक डॉ. विशाल ठणगन, बी. सी. सी. ए. कोर्स संयोजक प्रा. प्रविण यादव, एम. बी. ए. व बी. बी.ए. कोर्स संयोजिका डॉ. अश्विनी पुरोहीत, एन. सी. सी. प्रमुख डॉ. आशुतोष तिवारी तांत्रीक विशेषज्ञ प्रा. आकाश जैन आपण सर्वांचे मी हार्दीक आभार व्यक्त करतो. तसेच उपरोक्त रासेयो कार्यक्रम माननीय प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत सर यांच्या मार्गदर्शनात, निर्देशनात, सहकार्याने आणि प्रेरणेमुळे, शांततेत आनंदी वातावरणात संपन्न झाले. त्याबद्दल प्राचार्य सरांचे हार्दिक आभार.

**धन्यवाद.**

**दि. १९/०८/०२१**

| | |
|---|---|
| **संयोजक** | **अध्यक्ष/ प्राचार्य** |
| **डॉ. ए. बी. पटले** | **डॉ. एन. वाय. खंडाईत** |
| **राष्ट्रीय सेवा योजना समिती** | **राष्ट्रीय सेवा योजना समिती** |